



वागातोर किनाऱ्यावर ऑलिव्ह रिडले कासवांची घरटी वाढली

पान ३ वर


आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com

मुंबई इंडियन्सचा सलग दुसरा विजय

पान ४ वर

वेर्णा, शनिवार, १९ एप्रिल २०२५ | पाने ४ | ₹ ४ | REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 226 | Verna, | facebook.com/dainikherald | Saturday 19 April 2025 | Pages 4 | ₹ 4

## निवडक

### छत्तीसगडमध्ये २२ नक्षलवाद्यांना अटक

**छत्तीसगड, दि. १८ :** छत्तीसगडमधील विजापूर जिह्यात तीन वेगवेगळ्या ठिकाणांहून २२ नक्षलवाद्यांना अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून स्पोटक साहित्य जप्त करण्यात आले. अटक करण्यात आलेल्या नक्षलवाद्यांकडून बॉम्ब, जिलेटीनच्या कांड्या, डिटोनेटर, इलेक्ट्रिक वायर, बॅटरी, माओवादी फलक आणि इतर वस्तू जप्त करण्यात आल्याचे अधिकाऱ्याने सांगितले. या कारवायांमध्ये सुरक्षा कर्मचाऱ्यांची स्वतंत्र संयुक्त पथके सहभागी होती. या नक्षल्यांवर एकूण ४० लाख ५० हजार रुपयांचे बक्षीस घोषित करण्यात आले होते. यात १ पुरूष व १ महिला नक्सलीवर ८–८ लाख, १ पुरूष व १ महिला नक्सलीवर ५–५ लाख, २ पुरुष व ५ महिला २–२ लाख, १ पुरुष नक्सल वर ५० हजार असे एकूण ४० लाख ५० हजार रुपयांचे बक्षीस घोषित होते. नक्षल्यांना आत्मससमर्पणासाठी डीआरजी सुकमा, रेंज फिल्ड टीम (आरएफटी) कोंटा, सुकमा, जददलपूर सीआरपीएफ व कोबरा यांनी महत्वपूर्ण भूमिका बजावली आहे. आत्मसमर्पित नक्षल्यांवर विविध प्रकारचे गुन्हे दाखल होते.

---

### जगन मोहन रेड्डींवर ईडीकडून कारवाई

**अमरावती, दि. १८ :** आंध्रप्रदेशचे माजी मुख्यमंत्री जगन मोहन रेड्डी यांच्यावर ईडीकडून शुक्रवारी मोठी कारवाई करण्यात आली. सुमारे १४ वर्षे जुन्या मनी लाँड्रिंग प्रकरणात ईडीने जगन रेड्डी यांची ८०० कोटी रुपयांची जमीन मालमत्ता आणि शेअर्स जप्त केले आहेत. सक्तवसुली संचालनालयाच्या (ईडी) हैदराबाद युनिटने आंध्र प्रदेशचे माजी मुख्यमंत्री वायएस जगन मोहन रेड्डी यांचे २७.५ कोटी रुपयांचे शेअर्स तात्पुरते जप्त केले आहेत. वायएसआर काँग्रेस पक्षप्रमुखांच्या शेअर्ससह, केंद्रीय एजन्सीने त्याच प्रकरणात दालमिया सिमेंट्स (भारत) लिमिटेड (डीसीबीएल) यांच्या मालकीची ३७७.२ कोटी रुपयांची जमीनदेखील जप्त केली आहे. ईडीने जप्त केलेली मालमत्ता ७९३.३ कोटी रुपयांची असल्याचेदेखील डीसीबीएलने म्हटले आहे.

---

### हिमाचलमध्ये ड्रग्ज तस्करी रॅकेटचा भांडाफोड

**कांगडा, दि. १८ :** हिमाचलमधील कांगडा जिल्ह्यातील नूरपूर पोलिसांनी ड्रग्ज तस्करीविरुद्ध मोठी कारवाई केली आहे. पोलिसांनी एका आंतरराष्ट्रीय ड्रग्ज तस्करी टोळीचा पर्दाफाश केला आहे. ते दुबईहून चालवले जात आहे. पोलिसांनी तस्कराकडून लाखो रुपये आणि सोने–चांदीचे दागिनेही जप्त केले आहेत. पोलिसांनी पठाणकोट येथून मोहित सिंगला अटक केली आणि त्याच्या घरातून ४.९० लाख रुपये रोख, सोने–चांदीचे दागिने आणि विमा बाँड जप्त केले. गगन सरना यांच्या घरातून १.२५ किलो सोने, चांदी आणि १.१५ कोटी रुपये रोख जप्त करण्यात आले. आतापर्यंत पोलिसांनी या टोळीतील ६ आरोपींना अटक केली आहे.

गेल्या वर्षी २७ ऑक्टोबर रोजी दामतल पोलिस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या इंदोरा मोड येथून कुलदीप सिंगला २६२ ग्रॅम हेरॉइनसह पकडण्यात आले होते.

### हवामान

कमाल : ३२ किमान : २४

आर्द्रता : ७८

### बाजार भाव

सोने : ₹९७,६५० (१० ग्रॅम)

चांदी : ₹ ९९,१०० (१ किलो)

### शेअर मार्केट

सेन्सेक्स : ७८,३६५ .७७↑ (३१.१६ )

निफ्टी : २३,८३५.९० ↑ (८३.९५)

# मांद्रे परिसरात ९० व्हिलांच्या प्रकल्पाला पंचायतीची मंजुरी

## आमदार आरोलकरांच्या भूमिकेविषयी संभ्रम | ग्रामस्थांचा जोरदार विरोध

टीम दैनिक हेराल्ड



**पेडणे, दि. १८ : पेडणे तालुक्यातील मांद्रे ग्रामपंचायत क्षेत्रातील समुद्रकिनाऱ्यालगत ९० व्हिलांच्या भव्य प्रकल्पाला पंचायत मंडळाने मंजुरी दिली आहे. दोन मोठ्या रिअल इस्टेट कंपन्यांचे हे प्रस्ताव पंचायत मंडळाच्या नुकत्याच पार पडलेल्या बैठकीत सादर करण्यात आले होते. मांद्रेचे आमदार जीत आरोलकर यांच्या समर्थकांचा पंचायतवर प्रभाव असल्याने, आमदार स्वतः या संपूर्ण प्रकरणात नेमकी काय भूमिका घेणार याबाबत स्थानिकांमध्ये चर्चेला उधाण आले आहे.**

नगर नियोजन खात्याने झोन बदल व दुरुस्तीच्या नावाखाली कलम १७(२) आणि ३९(ए) अंतर्गत विकासबाह्य क्षेत्रात भूरूपांतरास मुभा दिल्याने हा मुद्दा सध्या न्यायप्रविष्ट बनला आहे. यापूर्वी आमदार आरोलकर यांनी पेडणे झोनिंग आराखड्यावर व भूरूपांतराच्या निर्णयावर तीव्र नाराजी व्यक्त करून ही रूपांतरे रद्द करण्याची मागणी केली होती. मात्र, आता त्यांच्या समर्थक असलेल्या पंचायत मंडळानेच मांद्रेतील व्हिलांच्या प्रकल्पास मान्यता दिल्यामुळे त्यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

पंचायत मंडळासमोर मंजुरीसाठी आलेल्या प्रस्तावांमध्ये रायगो होम्स प्रा. लि.' या कंपनीने सर्वे क्र. ३६५/२ (ए) या भूखंडावर निवासी इमारती, जलतरण तलाव आणि कुंपण बांधकामाचा प्रस्ताव दिला आहे. तांत्रिक अहवालानुसार, या जमिनीचा काही भाग सेटलमेंट', काही नो डेव्हलपमेंट' तर उर्वरित ऑर्चर्ड' झोनमध्ये येतो. दुसरा प्रस्ताव महाशीर हॉटेल्स अॅण्ड रिसॉर्ट्स प्रा. लि.' या कंपनीचा असून, ते सर्वे क्र. २११/२ (पी) आणि २१०/१–ए (पी) या जागांवर व्हिला प्रकल्प राबवणार आहेत. या दोन्ही प्रकल्पांमध्ये जलतरण तलावाचाही समावेश आहे. आश्चर्य म्हणजे या दोन्ही जमिनी सीआरझेड' (सागरी किनारपट्टी नियमन क्षेत्र) मध्ये येतात. अशा स्थितीत नगर नियोजन विभागाने या प्रकल्पांना तांत्रिक परवानगी कशी दिली, हा प्रश्नही उपस्थित झाला आहे. दोन्ही प्रस्तावांना एकाचवेळी मंजुरी मिळाल्याने पंचायत मंडळावर नेमका कुणाचा राजकीय दबाव होता, यावरही चर्चा सुरू झाली आहे.

पेडणे तालुक्यात सध्या वाढत्या बांधकामांमुळे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अधिकच गंभीर होत आहे. याच पार्श्वभूमीवर, आमदार जीत आरोलकर यांनी २४ ऑक्टोबर २०२४ रोजी उपजिल्हाधिकारी, पेडणे यांना पत्र पाठवून ३० एमएलडी क्षमतेच्या जलप्रकल्पाचे काम पूर्ण होईपर्यंत मांद्रे मतदारसंघातील कोणत्याही नवीन बांधकाम प्रकल्पास परवानगी न देण्याची विनंती केली होती. त्यावर प्रतिक्रिया देत उपजिल्हाधिकाऱ्यांनी गटविकास अधिकाऱ्यांना सूचना पाठवून, त्यांनी सर्व पंचायत सचिवांना नवीन परवाने न देण्याचे आदेश दिले होते.

मात्र, आता त्या सूचना डावलून मांद्रे पंचायत मंडळाने ९० व्हिलांच्या प्रकल्पाला मंजुरी दिल्यामुळे, आमदारांच्या आधीच्या भूमिकेला त्यांच्या समर्थक गटानेच हरताळ फासला का, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. पंचायत सचिवांनी या प्रकल्पासाठी पाण्याचा उपलब्धतेचा आढावा घेतला होता का, पंचायत मंडळासमोर ठराव ठेवताना आवश्यक बाबींची तपासणी झाली होती का? असे अनेक प्रश्न आता उभे राहिले आहेत.

### ९० व्हिला प्रकल्पांना दिलेली परवानगी रद्द करा

मांद्रे ग्रामसभेच्या ठरावाला डावलत पंचायत मंडळाने १७ एप्रिल रोजी झालेल्या बैठकीत एकूण ९० व्हिला प्रकल्पांना परवानगी मंजूर केल्याने स्थानिक ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप पसरला आहे. या पार्श्वभूमीवर १९ एप्रिल रोजी दुपारी १२:३० वाजता मोठ्या संख्येने जागृत नागरिक मांद्रे पंचायत कार्यालयात सरपंच आणि पंचायत सचिवांची भेट घेणार आहेत. या भेटीत कोणत्या जागांवर किती व्हिला मंजूर झाले, त्या भूखंडांची स्थिती काय आहे (डोंगर, सपाट जमीन, शेतीभूमी, वस्तीचा भाग इत्यादी) याबाबत सविस्तर माहिती मागण्यात येणार आहे. ही माहिती अधिवक्ता प्रसाद शहापूरकर यांनी दिली. अधिवक्ता शहापूरकर यांनी स्पष्ट केले की, १७ एप्रिल रोजी पंचायत मंडळाच्या बैठकीत ९० व्हिला प्रकल्पांना दिलेली परवानगी ही सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर ग्रामस्थांमध्ये संताप उसळलाआहे . ग्रामस्थांच्या संमतीशिवाय कोणत्याही प्रकारच्या बांधकाम परवानग्या पंचायतने देऊ नयेत असा ठराव या बैठकीत मंजूर झाला असल्याचेही त्यांनी सांगितले.गावकरी प्रतिनिधी विनायक चारी यांनी या बैठकीत बोलताना सांगितले की, जर दिल्लीहून येणारे लोक डोंगर कापून बेकायदेशीरपणे व्हिला उभारण्याचा प्रयत्न करत असतील, तर त्यांना रोखण्याचे काम आम्हीच करणार.जमिनींचे संरक्षण करणे हे आपले कर्तव्य आहे आणि त्या सुरक्षितपणे पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी आम्ही पुढील कृती आखणार आहोत, असेही त्यांनी ठामपणे नमूद केले.

# 'सुपारी संस्कृती'त वाढलेल्यांनी आरोप करू नये

## अभिनेते पोंक्षे यांचे मंत्री गावडेंना प्रत्युत्तर

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १८ :** गोवा राज्याचे कला व संस्कृती मंत्री गोविंद गावडे यांनी ज्येष्ठ अभिनेते शरद पोंक्षे यांच्यावर सुपारी घेऊन वक्तव्य केल्याचा आरोप केल्यानंतर, पोंक्षे यांनी प्रत्युत्तर देत मंत्री गावडे यांच्यावर जोरदार टीका केली आहे. सुपारी आणि पैसे घेणाऱ्या संस्कृतीत राहणारेच असे आरोप करतात, असे पोंक्षे यांनी ठामपणे म्हटले.

गावडे यांच्या वक्तव्याला उत्तर देताना पोंक्षे म्हणाले, मी कोणतीही सुपारी घेतलेली नाही. हे आरोप अशा लोकांकडून येतात जे स्वतः अशा प्रकारच्या व्यवहारात गुंतलेले असतात. नाटकाच्या सादरीकरणावेळी तांत्रिक अडचणीमुळे सुमारे १०–१२ मिनिटांचा व्यत्यय आला होता. त्यामुळे प्रेक्षकांची माफी मागितली. त्यावेळी प्रेक्षकांतून 'गावडे, गावडे' अशा हाकांचा आवाज येत होता. मला विचारल्यावर कळाले की त्या प्रतिक्रिया मंत्री गावडे यांच्याविरोधात आहेत. यापूर्वी मला त्यांच्याबद्दल माहितीही नव्हती.

पोंक्षे पुढे म्हणाले, मुख्यमंत्री प्रमोद सावंत हे माझे मित्र आहेत. कोट्यवधी रुपये खर्चून कला अकादमीचे नूतनीकरण करण्यात आले, मात्र मेकअप रूममधील एअर कंडिशनरमधून गळती होत होती. अशा परिस्थितीत मंत्री माफी मागण्याऐवजी मला 'सुपारीबाज' म्हणून बदनाम करत आहेत. हीच त्यांची कार्यपद्धती दिसते.

जर मंत्री गावडे यांनी आपली चूक मान्य केली असती आणि भविष्यात अशा घटना टाळण्याची हमी दिली असती, तर हा प्रकार वाढला नसता. पण त्यांनी उलट माझ्यावरच टीका केली. कला अकादमीसारख्या महत्त्वाच्या संस्थेची जबाबदारी कलेची जाण असलेल्या आणि योग्य प्रशिक्षण असलेल्या व्यक्तीकडे दिली पाहिजे. तसेच शोदरम्यान ध्वनी आणि प्रकाश अभियंते उपस्थित असणे आवश्यक आहे, असेही पोंक्षे यांनी स्पष्ट केले. गावडे यांनी आरोप केला होता की, शरद पोंक्षे यांनी माझे नाव माध्यमांमध्ये घेतले ते फक्त माझी प्रतिमा मलिन करण्यासाठी. माझ्या विरोधात काही जणांनी सुपारी घेतली आहे.

या आरोपांवर प्रतिक्रिया देताना पोंक्षे म्हणाले, मी कलाकार आहे, गुंड नाही. नाटक विस्कळीत होणे ही नाट्य सादरीकरणातील तांत्रिक अडचण होती. त्याची जबाबदारी मंत्री म्हणून गावडे यांनी स्वीकारायला हवी होती.

दरम्यान, पोंक्षे यांच्या 'पुरुष' या नाटकादरम्यान तांत्रिक अडचणीमुळे सादरीकरणात व्यत्यय आल्याने रविवारी संध्याकाळपासून हा वाद सुरू झाला. पोंक्षे यांनी व्यासपीठावरून प्रेक्षकांची माफी मागितली आणि त्यानंतर सरकारवर उघडपणे टीका करत ही बाब सार्वजनिक केली.

# शेती नुकसानीप्रकरणी २ कोटी रुपये भरा!

## गोवा खंडपीठाचे तीन खाण कंपन्यांना आदेश

■ टीम दैनिक हेराल्ड



**पणजी, दि. १८ :** सत्तरी तालुक्यातील शिरगाव येथील शेतजमिनींच्या झालेल्या नुकसानीच्या पार्श्वभूमीवर, मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठाने सेसा माइनिंग कॉर्पोरेशन, राजाराम बांदेकर आणि चौगुले अँड कंपनी या तीन खाण कंपन्यांना जिल्हा खनिज निधीमध्ये (डीएमएफ ) २ कोटी रुपये भरण्याचे आदेश दिले आहेत.

न्यायमूर्ती एम.एस. कर्णिक आणि न्यायमूर्ती निवेदिता मेहता यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. या प्रकरणात २००८ साली दाखल झालेली रिट याचिका क्रमांक १/२००८ देखील याच निर्णयान्वये निकाली काढण्यात आली. ही याचिका शिरगाव मधील ग्रामस्थांनी त्यांच्या शेतीच्या जमिनींना, विशेषतः सावंत आणि खरात खाजणांमध्ये झालेल्या नुकसानाच्या तक्रारीवरून दाखल केली होती.

या संदर्भात जलसंपदा विभागाने शिरगावमधील एकूण नुकसान सुमारे ४ कोटी रुपये इतके असल्याचा अहवाल सादर केला होता. यातील २ कोटी रुपयांचा खर्च तत्काळ दुरुस्ती कामांसाठी जिल्हा खनिज निधीतून करण्यात आला होता. हा निधी उर्वरित कंपन्यांनी परत करावा, अशी अट आधीच घालण्यात आली होती.

मात्र संबंधित खाण कंपन्यांनी उर्वरित रक्कम भरण्यास नकार दिला. त्यांनी युक्तिवाद केला की त्यांनी पूर्वीच जिल्हा खनिज निधीमध्ये योगदान दिले असून, त्याचा वापर पर्यावरणीय नुकसान भरपाईसाठी करावा. न्यायालयाने या युक्तिवादास तीव्र शब्दांत फेटाळले आणि 'प्रदूषक पैसे देतो' या तत्त्वाचा आधार घेत स्पष्ट केले की, खाण कंपन्यांनी नुकसानभरपाईची पूर्ण जबाबदारी उचलली पाहिजे. सार्वजनिक निधी किंवा करदात्यांचा पैसा या उद्देशासाठी वापरता येणार नाही, असा निर्वाळा न्यायालयाने दिला.

खंडपीठाने नमूद केले की, जिल्हा खनिज निधीचा उद्देश खाण कार्यामुळे बाधित झालेल्या समुदायाच्या कल्याणासाठी आहे. तो खाण कंपन्यांना जबाबदारीपासून वाचवण्यासाठी वापरणे चुकीचे ठरेल. न्यायालयाने स्पष्ट केले की, खाणकाम ही नैसर्गिक पर्यावरणावर प्रतिकूल परिणाम करणारी प्रक्रिया आहे आणि त्याच्या दुष्परिणामांची जबाबदारी कंपन्यांनीच घ्यावी.

कंपन्यांनी शेवटपर्यंत कोणतेही नुकसान झाल्याचा इन्कार केला असला तरी, 'निरी' व इतर सरकारी यंत्रणांच्या अहवालांनी त्यांच्या भूमिकेला छेद दिला. त्यांनी असा दावा केला की स्थानिक ग्रामस्थांना शेतीपेक्षा नुकसानभरपाईत अधिक रस आहे. मात्र, गोवा राज्याच्या महाधिवक्त्यांच्या कार्यालयाने कंपन्यांनी पूर्वी केलेल्या कराराची प्रत सादर करत त्यांच्या जबाबदारीची पुष्टी केली. त्या करारात स्पष्ट उल्लेख आहे की खाण भाडेपट्टा क्षेत्राबाहेरही झालेल्या नुकसानीस कंपन्याच जबाबदार असतील.

# भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात दीड वर्षाच्या चिमुकलीचा बळी

## १५ कुत्र्यांनी तोडले कोवळ्या बाळाचे लचके | फोंडा परिसरात दु:ख आणि तीव्र संताप

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १८ :** सुट्टी घालवण्यासाठी आईसोबत आजोळी आलेल्या एका निष्पाप दीड वर्षांच्या चिमुकलीवर भटक्या कुत्र्यांनी केलेल्या हल्ल्यात तिचा दुर्दैवी मृत्यू झाला. ही हृदयद्रावक घटना शुक्रवारी सकाळी साडेसहा वाजता फोंड्याजवळील तळे – दुर्गाभाट येथे घडली. अनादिया शेख या निष्पाप चिमुकलीने अंगणाबाहेर पाऊल टाकताच मृत्यूने तिच्यावर घाला घातला.

अनादिया ही अवघी १९ महिन्यांची. आईसोबत दोन दिवसांपूर्वीच आजोळी तळे – दुर्गाभाट येथे आली होती. घरात सर्वांची अत्यंत आवडती अशी ही चिमुरडी शुक्रवारी सकाळी पावणेसातच्या सुमारास दरवाजा उघडा असल्यामुळे अंगणात आली. गेटही उघडेच होते. क्षणाचाही विलंब न लावता ती चिमुरडी रस्त्यावर आली आणि अगदी काही क्षणांतच तिचे आयुष्य काळाने हिरावून नेले.

परिसरात भटकत असलेल्या सुमारे १५ कुत्र्यांनी तिला घेरले आणि क्षणार्धात तिच्यावर जबरी हल्ला चढवला. त्यांनी तिला जवळपास ५० फुट फरफटत नेले. तिच्यावर असंख्य वेळा चावा घेतला, विशेषतः मानेवर खोल जखमा केल्या. तिचा आक्रोश परिसरात घुमला, पण वेळ हातातून निसटली होती. एक स्थानिक नागरिक मॉर्निंग वॉकसाठी निघाले असता त्यांना हा संतापजनक प्रकार दिसून आला. त्यांनी आरडाओरड करत कुत्र्यांना हाकलले आणि तातडीने मदत केली. अनादियाला फोंड्यातील उपजिल्हा रुग्णालयात हलवण्यात आले, मात्र तिथे डॉक्टरांनी तिचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी बातमी दिली. तिच्या आईचा हंबरडा इस्पितळाच्या चार भिंती पार करत साऱ्या गावाला अश्रूंत भिजवून गेला.

सीसीटीव्ही फुटेजमध्ये मुलगी गेटमधून बाहेर पडून रस्त्यावर येत असल्याचे दिसून आले आहे. पोलिस उपअधीक्षक शिवराम वायंगणकर म्हणाले की, काही अंतर चालत



असताना सुमारे १५ कुत्र्यांच्या टोळीने हल्ला केला. मुलीने मदतीसाठी ओरड केली, पण तिला मदत मिळण्यापूर्वीच ती बेशुद्ध पडली. तिच्यावर हल्ला करणारे कुत्रे काही काळ शांत राहिले, परंतु स्थानिकांनी जखमी मुलीला पाहिले आणि तिला एसडीएचमध्ये हलवले जिथे तिला मृत घोषित करण्यात आले. त्यांनी सांगितले की, कुत्र्याच्या चाव्यामुळे मुलीला अनेक जखमा झाल्या आहेत.

ही चिमुकली मूळची उसगावची आहे आणि तिचे कुटुंब शापूर फोंडा येथे राहते. ही मुलगी आईसह तळे दुर्गाभाट येथील तिच्या आजीच्या घरी राहण्यासाठी आली होती. या घटनेने संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून, भटक्या कुत्र्यांच्या वाढत्या संख्येविरोधात तीव्र संताप उसळला आहे. लोकांनी प्रशासनाकडे ठोस उपाययोजनांची मागणी केली आहे. अजून किती निरागस जीव अशा कुत्र्यांच्या हल्ल्यात गमवावे लागतील? असा सवाल आता संतप्त नागरिक विचारू लागले आहेत.

अनादियाच्या मातेचे दुःख शब्दात व्यक्त करणे कठीण आहे. काही दिवस माहेरी जाऊन विश्रांती घेण्याचा विचार करून ती आली होती; पण त्या विश्रांतीच्या जागी दुःखाचे कढ उभे राहिले. आपल्या तान्हुल्या लेकराचे रक्ताने माखलेले शरीर पाहून तिची किंकाळी अनेकांचे काळीज चिरून गेली.

दुर्गाभाट– तळे येथील स्थानिकांनी सांगितले की, त्यांच्या परिसरात भटक्या कुत्र्यांची संख्या वाढली आहे आणि त्यापैकी बरेचजण दुचाकी आणि कारचा पाठलाग करतात.

काही जण या कुत्र्यांना अन्न खायला घालतात पण हे कुत्रे भूक लागल्यावर आक्रमक होतात. स्थानिकांनी असेही निदर्शनास आणून दिले की येथील एका वेगळ्या रस्त्यावर एक ब्लॅक स्पॉट आहे जिथे जाणारे लोक ओला कचरा टाकतात आणि अन्न वाया घालवतात. त्यामुळे भटक्या कुत्र्यांची संख्या वाढते.

या घटनेने संपूर्ण परिसरातील नागरिक दु:ख आणि संताप व्यक्त करीत आहेत. सध्या तरी भटक्या कुत्र्यांवर नियंत्रण मिळवण्यासाठी आणि अशा दुर्दैवी घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी प्रशासनाने तातडीने कारवाई करावी, हीच मागणी गावकऱ्यांकडून जोर धरत आहे.

> न्यायालयाच्या आदेशानुसार , भटक्या कुत्र्यांना मारता येत नाही. आमची नगरपालिका भटक्या कुत्र्यांना लसीकरण करण्याचे काम करते. तथापि, परिसरात अनेक भटके कुत्रे आहेत, ज्यांना विविध ठिकाणी लोक खायला घालतात. ज्या भागात दीड वर्षांच्या मुलीवर हल्ला झाला त्या भागात अशा कुत्र्यांची संख्या जास्त आहे. या कठीण काळात मी शोकाकुल कुटुंबासोबत आहे. लोकांनी आपल्या मुलांची काळजी घ्यावी, कारण असे कुत्रे सगळीकडे आहेत.
>
> – रवी नाईक, आमदार - फोंडा.